वर्ष-०८ अंक-२५ मुंबई, मंगळवार १० ते १६ मे - २०२२ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

PG 2

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

शेतकरी बांधवांना बियाणे व खते कमी पडू देणार नाही

3 → मजूर महिलेच्या बाळाचं अपहरण, अवघ्या 8 तासांत चिमुकल्याची सुखरूप सुटका; आरोपी अटकेत

गुलिस्तानगरमध्ये दोघांवर चाकूने हल्ला; एकाचा मृत्यू ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## दुप्पट नफ्याचे आमिष दाखवत साडेचार लाखांचा गंडा घालणारा भामटा वर्षभराने गजाआड




डोंबिवली : दुप्पट नफ्याचे आमिष दाखवत एका इसमाला तब्बल साडेचार लाख रुपयांचा गंडा घालून पसार झालेला भामटा वर्षभराने गजाआड झाला आहे. डोंबिवलीतील विष्णू नगर पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत. अनिल पेदुरी असं या आरोपीचं नाव आहे. व्हॉट्सअपच्या माध्यमातून संपर्क करत दुप्पट नफ्याचं आमिष दाखवत तो लोकांना गंडा घालत होता. आरोपी अनिल पेदुरी अस या आरोपीचे नाव असून गुन्हा दाखल होताच हा भामटा गुजरातला पळून गेला होता. वारंवार मोबाईल नंबर आणि ठिकाणं बदलत वर्षभर पोलिसांना चकवा देत होता. अखेर पोलिसांनी तांत्रिक दृष्ट्या तपास करत या भामट्याला गुजरातमधील सूरत इथे सापळा रचून अटक केली. त्याने अजून किती जणांची फसवणूक केली आहे याचा शोध पोलीस घेत आहेत डोंबिवली इथे राहणाऱ्या तक्रारदाराची अज्ञात व्यक्तीने व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधून ओळख वाढवली. एका कंपनीत पैशांची गुंतवणूक करण्यास सांगत या भामट्याने त्यांना दुप्पट नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवलं होतं.

या आमिषाला बळी पडत संबंधित फिर्यादीने त्याला सांगण्यात आलेला बँक खात्यावर साडेचार लाख रुपये जमा केले. गुंतवणूक केल्यानंतर वर्षभराचा कालावधी उलटला मात्र पैसे परत न मिळाल्याने तक्रारदाराला आपली फसवणूक झाल्याचं लक्षात आलं. त्यांनी या प्रकरणी डोंबिवलीतील विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रानुसार गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल होताच आरोपी अनिल पेदुरी पसार झाला होता.

आरोपी अनिल पेदुरी गेल्या वर्षभरापासून आपले मोबाईल नंबर आणि राहण्याचं ठिकाण बदलत तो पोलिसांना चकवा देत होता. मात्र विष्णुनगर पोलिसांचं एक पथक त्याच्या मागावर होतं. अखेर तांत्रिक पद्धतीने तपासादरम्यान त्यांना अनिलचा ठावठिकाणी सापडला. तो गुजरातमधील सूरत इथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांचं पथक सूरत इथे दाखल झालं. तिथे सापळा रचत अनिल पेदुरीला बेड्या ठोकल्या. अनिलने आणखी किती जणांचे अशाप्रकारे फसवणूक केली आहे, याचा तपास सध्या सुरु आहे.

## रेल्वे वर जबरी दरोडा टाकणारा सराईत गुन्हेगारावर पोलिसांकडून अटकेची कार्यवाही



औरंगाबाद :स्थानिक गुन्हेशाखा यांनी देवगिरी एक्सप्रेसवर चोरी करणाऱ्या आरोपीस ताब्यात घेतले. मिळालेल्या माहिती नुसार दिनांक :२२/४/२०२२ रोजी रात्रीच्या दरम्यान आरोपी याने पोटुळ रेल्वे स्टेशन येथील सिग्नलचे कनेक्शन कट करून देवगीरी एक्सप्रेस थांबवुन गाडीवर दगडफेक करून चोरटयांनी खिडकीमध्ये हात टाकुन महीला प्रवासी यांच्या गळयातील सोन्याची चैन वजन ३५ ग्रॅम किमंत अं. २५०००० रू ची जबरीने ओढुन घेउन चोरून पळुन गेले. याबाबत महिला यांनी दिलेल्या फिर्याद वरून रेल्वे पोलीस ठाणे औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.मा मोक्षदा पाटील पोलीस अधिक्षक लोहमार्ग औरंगाबाद यांनी लागलीच रेल्वे सुरक्षा बल व लोहमार्ग पोलीसांची तातडीची बैठक घेवुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी योग्य त्या सुचना देवून आरोपीचा शोध घेण्याचे सांगितले त्यावरून रेल्वे पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध घेत होते . लोहमार्ग पोलीसांनी औरंगाबाद शहरात आणि बाजुच्या परीसरात गोपनिय बातमीदार नेमुण ठेवले होते. त्याचआधारे सपोनि श्री प्रशांत गंभीरराव यांना दिनांक २६.०४.२०२२ रोजी गुप्त बातमी मिळाली की,औरंगाबाद शहरातील सिडको एन-७ भागामध्ये काही इसम हे चोरीची सोन्याची चैन विकी करण्यासाठी आले आहे. सदर बाबत अधिक माहिती घेतली असता वरिल प्रमाणे चोरीचे सोने विक्री करण्यासाठी आलेला इसम हा वाळुज गायराण भागात राहणारा कुख्यात आरोपी शिवानंद ठकसेन काळे वय ४० वर्ष असल्याचे समजले त्यावरुन वरून सपोनि / गंभीरराव यांनी तपासाची चक्रे फिरवली, तांत्रीक पुराव्याच्या आधारे सदरचा गुन्हा हा शिवानंद काळे याने व त्याचे साथीदारांनी मिळुन केला ...पान २ वर...

## ट्रक व टॅम्पो चोरी करणा-या आरोपींना गजाआड करण्यात पेल्हार पोलीसांना यश.




नालासोपारा : पेल्हार पोलिसांनी नालासोपारा येथून चार चाकी वाहन चोरी करणाऱ्या गुन्हेगारांस अटक केली असून त्यांनी चोरलेले ट्रक व टॅम्पो पोलिसांनी हस्तगत केला आहे. अधिक माहिती अशी कि दिनांक : २४/४/२०२२ रोजी समीम अस्लमअली खान यांनी पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत जायका हॉटेल समोर, पेल्हार रोड, वाकणपाडा, नालासोपारा (पु.), येथे त्यांचा टाटा कंपनीचा ट्रक उभा करून ठेवला असताना अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेला त्यावेळी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपी विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे दिनांक २४/०४/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.तसेच दिनांक २६/४/२०२२ रोजी सोमनाथ बाबासाहेब नरुटे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती कि दिनांक २५/४/२०२२ रोजी नसिमभाई यांचे सर्विस सेंटर समोर, वंगणपाडा, पो. पेल्हार, नालासोपारा (पु.), याठिकाणी टाटा कंपनीचा टेम्पो हा पार्क करुन ...पान २ वर...

## मंदिराच्या पुजाऱ्याच्या हत्येचा उलगडा, पोटचा मुलगाच मारेकरी असल्याचं उघड



वाशिम : वाशिमच्या दुर्गामाता संस्थान मंदिराचे पुजारी मारोती पुंड यांच्या हत्या प्रकरणाचा उलगडा झाला आहे. मारोती पुंड यांच्या पोटच्या मुलानेच त्यांची हत्या केल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. पोलिसांनी गणेश मारोती पुंड (वय 30 वर्षे, रा. केकतउमरा) याला अटक केली आहे. चांगली वागणूक देत नसल्याच्या रागातून मुलाने पित्याची हत्या केल्याचं उघड झालं आहे. काय आहे प्रकरण?

वाशीम ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केकतउमरा गावालगत असलेल्या दुर्गा मातेच्या मंदिरातील पुजारी मारोती पुंड यांची दोन दिवसांपूर्वी (7 मे) हत्या झाली होती. मारोती पुंड झोपले असताना रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तीने मंदिरात प्रवेश करुन पाठीमागून त्यांच्यावर मानेवर आणि डोक्यावर धारदार शस्त्राने वार केले होते. शिवाय मंदिरातील दोन दानपेट्या घेऊन फरार झाला. या घटनेत मारोती पुंड यांचं मृत्यू झाला होता. नेहमीप्रमाणे मारोती यांचा मुलगा गणेश वडिलांना उठवण्यासाठी मंदिरात गेला असता ते रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले. गणेशने याबाबत गावातील नागरिकांना माहिती दिली. त्यानंतर नागरिकांनी याची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी डॉगस्कॉड आणि फिगर एक्स्पर्ट तज्ज्ञांसह पाहणी केली. मंदिरातील तीन दान पेट्यांपैकी दोन पेट्या गायब असल्यामुळे चोरीच्या उद्देशाने हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला होता.

या घटनेचा तपास करणं पोलिसांसाठी मोठं आव्हान होतं. मात्र ...पान २ वर...

## वेश्याव्यवसाय करणा-या महिला दलालास अटक करुन पोलिसांनी केली 02 मुलींची सुटका




भाईंदर : दिनांक ०७.०५.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाचे सहा.पोउपनि. उमेश पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, महिला वेश्यादलाल ज्योत्स्ना उर्फ ज्योती रा. वसई ही महिला तिच्या संपर्कातील पुरुष गि-हाईकांना मुलींचे फोटो पाठवून गि-हाईकांच्या पसंतीनुसार वेश्यागमनाच्या मोबदल्यात मिरा-भाईंदर, वसई-विरार परिसरातील लॉजवर मुली पुरविते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री एस एस पाटील यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना शांती शॉपिंग सेंटर पूर्व मधील गाळा क्र. ए/३०, शांतीसागर हॉटेल, मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ, मिरारोड पूर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पाहण्यासाठी पोलीस पथकासह दिनांक ०७/०५/२०२२ रोजी छापा टाकला असता महिला वेश्यादलाल ज्योत्स्ना उर्फ ज्योती देवायत राम हिने वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गि-हाईक सहा. पोलीस आयुक्त, कडुन रक्कम स्वीकारल्याने तिस ताब्यात घेवुन दोन मुलींची सुटका करण्यात आली आहे . सदर बाबत सपोउपनि उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन महिला आरोपी ज्योत्सना उर्फ ज्योती देवायत राम विरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असून महिला दलालास अटक करण्यात आले आहे. सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव पाटील, सपोनिउनि उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पोशि/ केशव शिंदे, मपोहवा/ वैष्णवी यंबर, मपोहवा/ सुप्रिया तिवले, चा.पोहवा/ गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी केली आहे.

## चॉकलेट देण्याच्या बहाण्याने 70 वर्षीय वृद्धाकडून 6 वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार; गुन्हा दाखल



चॉकलेट देण्याच्या बहाण्याने शेजारी राहणाऱ्या 6 वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार मुंबईतील आग्रीपाडा परिसरात घडला आहे, आग्रीपाडा पोलिसांनी एका 70 वर्षीय वृद्धाला अटक केली आहे, दरम्यान आरोपी हा निवृत्त राज्य सरकारी कर्मचारी असल्याचे समजते. चॉकलेट देण्याच्या बहाण्याने घरी बोलावलेपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि पीडित तरुणी भायखळा येथे एकाच परिसरात राहतात. आरोपी पत्नी, मुलगा आणि मुलाच्या कुटुंबासह राहतो. आरोपीने काही दिवसांपूर्वी पीडितेचा विनयभंग केला होता, तो घरी एकटा असताना पीडितेला चॉकलेट देण्याच्या बहाण्याने घरी बोलावले. ही घटना 6 मे रोजी उघडकीस आली, जेव्हा आरोपीने तिला घरी एकटी असताना पुन्हा फोन करायला सुरुवात केली. आरोपीकडून कोणालाही न सांगण्याची धमकी लिस अधिकाऱ्याने सांगितले, पीडिता रडू लागली. तिच्या आईने कारण विचारले असता तिने सांगितले की, काही दिवसांपूर्वी आरोपीने तिला आपल्या घरी बोलावले आणि तिला अयोग्यरित्या स्पर्श केला. आरोपीने तिला चॉकलेट्सही दिली आणि कोणालाही न सांगण्याची धमकी दिली, पीडितेने पुढे सांगितले की, आरोपी तिला पुन्हा आपल्या घरी बोलवत आहे. त्यानंतर कुटुंबाने आग्रीपाडा पोलिसांशी संपर्क साधण्याचा निर्णय घेतला, आणि त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला, असे आग्रीपाडा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक योगेंद्र पाचे यांनी सांगितले. पोलिसांनी आईचे जबाब नोंदवले तसेच पीडितेचीही पडताळणी केली आणि 376 (बलात्कार) आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा (POCSO) अंतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपीला तत्काळ अटक करून शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले. तो मंगळवारपर्यंत पोलिस कोठडीत असल्याचे पाचे यांनी सांगितले.

## धक्कादायक! डॉक्टरकडून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार, नांदेड जिल्ह्यातील घटनेने खळबळ

नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे वैद्यकीय क्षेत्राला काळिमा फासणारी घटना घडली आहे. किनवट येथील शरयू हॉस्पिटलचा डॉक्टर विकास सुंकलवार याने त्याच्या खासगी रुग्णालयात कामासाठी असलेल्या 14 वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. डॉक्टराच्या अत्याचारात पीडित अल्पवयीन मुलगी गरोदर राहिली. 6 मे 2022 रोजी नराधम डॉक्टरने पीडितेचा गर्भपात देखील केला आहे.



पीडिता नोव्हेंबर 2019 पासून मार्च 2022 पर्यंत विकास सुंकलवार याच्या शरयू हॉस्पिटलमध्ये सफाई कामगार म्हणून कामास होती. तिच्यासोबत सलगी करत आणि तिला वेगवेगळी आमिषे दाखवत डॉ. सुंकलवार याने तिच्यावर अनेक वेळा लैंगिक अत्याचार केले. सततच्या प्रकाराला कंटाळून आणि हा प्रकार कोणाला सांगितला तर ठार मारून टाकीन अशी धमकी दिल्यामुळे पीडितेने तेथील काम बंद केले. त्यानंतर पोट दुखत असल्यामुळे पीडिता डॉक्टरकडे गेली. डॉक्टरच्या अत्याच्यारामुळे पीडिता गर्भवती राहिल्याचे तपासणीतून उघड झाले. परंतु, चाचणीपूर्वीच तिचा गर्भपात झाल्याचे समोर आले. त्यामुळे पीडितेच्या जबाबावरून पोलिसांनी संशयित डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल केला.

दरम्यान, पीडित मुलीने याबाबत तक्रार केल्यानंतर किनवट पोलीस ठाण्यात संशयित डॉक्टरविरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकारानंतर संबंधित डॉक्टरला अटक करण्यात आली आहे. संशयित डॉक्टरवर कडक करवाई करण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. नागरिकांतून संशयित डॉक्टरविरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे.

## बोईसरमधील कंपनीत राडा; 19 पोलिस जखमी, 27 जणांना अटक



बोईसरमधील सर्वात मोठ्या असलेल्या विराज प्रोफाइल या कंपनीत काल लेबर युनियनच्या स्थापनेवरून भीषण असा राडा झाला. मुंबई लेबर युनियनच्या कर्मचाऱ्यांनी थेट कंपनीत शिरकाव करत कंपनीत तोडफोड सुरू केली. त्यानंतर मध्यस्थी करणाऱ्या पोलिसांनाही या कर्मचाऱ्यांनी मारहाण केली. त्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज सुरू केला. या मारहाणीत 17 पोलिस कर्मचारी आणि दोन पोलिस अधिकारी जखमी झाले असून त्यांच्यावर बोईसर येथील तुंगा आणि टिमा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या कंपनीच्या परिसराला सध्या पोलीस छावणीचं स्वरूप आलं आहे .

बोईसर तारापूर औद्योगिक वसाहतीतील विराज प्रोफाइल या कंपनीतील युनियन स्थापनेचा वाद थेट हाणामारी, दगडफेक आणि लाठीचार्ज या वर जाऊन पोहोचला आहे. मागील दोन महिन्यांपासून मुंबई लेबर युनियन आणि स्थानिक विराज कंपनीतील युनियन यांच्या ...पान २ वर...

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

✪ मुंबई, मंगळवार १० ते १६ मे - २०२२




# शिवसेना संपवण्याचा ज्यांनी प्रयत्न केला, त्यांना संपवत शिवसेना पुढे गेली -उद्धव ठाकरे

**मुंबई : काही क्षण असे असतात की त्या काळात आपण जातो आणि शब्द सुचेनासे होतात. धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे चित्रपटाची झलक बघताना शिवसेना म्हणजे काय आहे? शिवसैनिक म्हणजे काय आहे? गुरू आणि शिष्याचे नाते जपणारा शिवसेना हा एकमेव पक्ष आहे.**

ही भावना असल्याने शिवसेना संपवण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. पण ज्यांनी हा प्रयत्न केला त्यांना संपवून शिवसेना पुढे गेली, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला. आनंद दिघे हे ५० वर्षे काम केले पण ते १०० वर्षे जगले असेही गौरवोद्गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काढले. आनंद दिघे यांच्यावरील धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे चित्रपटाच्या ट्रेलर लॉंचच्या वेळी ते बोलत होते.

आनंद दिघेंची निष्ठा काय हे लोकांना चित्रपटाद्वारे कळेल. दिघेंनी अनेकांना जपले. पण बाळासाहेबांचा वक्तशीरपणा या गुणामुळेच आनंद दिघेंसारखे अनेक शिवसैनिक त्यांनी घडवले. धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे यापुढे ठाणेकरांचे हृदय ही एक ओळ असायला हवी होती. दिघेंवर चित्रपट काढत त्यांचे कार्य पुढे नेणे ही कौतुकास्पद गोष्ट असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रवीण तरडे यांनी तर आनंद दिघेंच्या भूमिकेत प्रसाद ओक आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर लॉंचच्या निमित्ताने अब्दुल सत्तार, आमदार रवींद्र फाटक, जॅकी श्रॉफ, श्रुती



मराठे, सुशांत शेलार, खासदार हेमंत पाटील, खासदार राजन विचारे, आमदार प्रताप सरनाईक, संजय राऊत, शर्मन जोशी, दिव्या दत्ता, वरूण सरदेसाई, गुलशन ग्रोवर, अमिषा पटेल, इशा कोप्पीकर, खासदार गजानन कीर्तीकर, ठाणे जिल्हाधिकारी राजेशनार्वेकर, बच्चू कडू, रितेश देशमुख, आमदार सुनील शिंदे यांचीही उपस्थिती होती.

दरम्यान, शिवसेना नेते आणि मंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, या चित्रपटाला साऊथचे सुपरस्टार राजा मौली, अमिताभ बच्चन यांनी शुभेच्छा दिल्या. आनंद दिघे यांनी शिवसेना प्रमुखांच्या विचाराने प्रेरित होऊन सामान्य अडलेल्यांना मदत केली. आनंद दिघेंची भूमिका अभिनेते प्रसाद ओक यांनी साकारली असे ते म्हणाले, आजच्या कार्यक्रमाला उपस्थित हे सर्व लोक आहेत याचे श्रेय दिघे यांच्या कार्याला जाते असेही शिंदे म्हणाले.

याप्रसंगी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह अभिनेता सलमान खान, रितेश देशमुख, खासदार संजय राऊत, रश्मी ठाकरे, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, कृषी मंत्री दादा भुसे, अब्दुल सत्ता, बच्चू कडू यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांचा सत्कार केला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते धर्मवीर आनंद दिघे यांची भुमिका करणारे अभिनेते प्रसाद ओक, दिग्दर्शक प्रवीण तरडे आणि अन्य कलाकार तंत्रज्ञांचा सत्कार झाला.

# कासाडी नदीचे पाणी प्रदूषित

**नवी मुंबई-** तळोजा एमआयडीसीतून वाहणाऱ्या कासाडी नदीचे पाणी प्रदूषित असल्याचा निष्कर्ष मुंबई आयआयटी या संस्थेने काढला आहे. राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या आदेशानंतर एमआयडीसीतील वेगवेगळ्या तीन ठिकाणांहून नदीच्या पाण्याचे नमुने तपासण्यासाठी घेण्यात आले होते. या नमुन्यांची तपासणी केली असता पाण्यातील द्रवरूप ऑक्सिजनची घनता कमी झाली आहे. तसेच रसायनांचे प्रमाणे वाढल्याने जलचरांना धोका निर्माण झाल्याचे निष्कर्ष काढण्यात आला आहे. मागील अनेक दिवसांपासून तळोजातील पाण्याच्या प्रदूषणाची समस्या ऐरणीवर आली आहे. विविध सामाजिक संघटनांनी याप्रकरणी आवाज उठवल्यानंतर राष्ट्रीय हरित लवादाने या प्रश्नाकडे लक्ष केंद्रित केले आहे. त्यानुसार कासाडी नदीतील पाण्याची शुद्धता तपासणी करण्याच्या सूचना लवादातर्फे संबंधित यंत्रणांना देण्यात आले होते. तसेच मुंबई आयआयटीला याबाबतचा नियोजन आराखडा तयार करण्याचे आदेशही



देण्यात आले आहेत. कासाडी नदीच्या पाण्याचे प्रदूषण मोजण्यासाठी मुंबई आयआयटीच्या पथकांनी काही दिवसांपूर्वीच तीन वेगवेगळ्या ठिकाणी पाण्याचे नमुने घेतले होते. त्यांची तपासणी केली असता, रासायनिक ऑक्सिजनची मागणी आणि जैविक ऑक्सिजनची मागणी जास्तीत जास्त परवानगी मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे दिसून आले आहे. तसेच रासायनिक घनपदार्थ विरघळलेल्याचे आढळून आले आहे.

तळोजा एमआयडीसीमधील उद्योगांमधून कासाडी नदीत विनाप्रक्रिया करता रासायनिक पाणी नदीत सोडले जात असल्याने पाण्याचे प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे प्रदूषण फक्त कासाडी नदीपुरतेच मर्यादित राहत नाही, तर नदी पुढे तळोजा खाडीत वाहत जाते. त्यापर्यंत प्रदूषित पाण्यामुळे दुर्गंधी येत असल्याच्या अनेक तक्रारी या खाडी आणि नदीच्या किनारी असणाऱ्या वसाहतींमधील नागरुकांनी नोंदवल्या आहेत. तसेच तळोजा खाडीमार्गे प्रदूषित पाणी नदी आणि समुद्रात सोडले जात असल्याने खाऱ्या पाण्यातील जलचरांच्या आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

# तिकीट आरक्षणासाठी प्रवाशांच्या रांगा

**मुंबई-** कोरोना आणि त्यानंतरच्या संपामुळे एसटीची सेवा जवळपास तीन वर्षे रखडली होती. गेल्या २२ एप्रिलपासून एसटीची राज्यभरातील सेवा पूर्वपदावर येत असताना मात्र अनेक आगारांमध्ये नियोजनाचा अभाव असल्याचे चित्र आहे. उन्हाळी सुट्टीनिमित्त आगाऊ आरक्षणासाठी प्रवाशांची मुंबई सेंट्रल आगारात गर्दी वाढली आहे; मात्र एकच तिकीट खिडकी सुरू असल्याने प्रवाशांना तासन् तास रांगेत उभे राहावे लागत आहे.

पाच महिन्यांच्या संपानंतर पूर्वपदावर आलेल्या एसटीच्या प्रवाशांची संख्या वाढत आहे. त्यातच उन्हाळी सुट्ट्यांमुळे अनेक मार्गांवरील प्रवासी संख्येत मोठी वाढ झाली आहे. गैरसोय टाळण्यासाठी अनेक जण आगाऊ आरक्षणास प्राधान्य देतात; मात्र एसटीच्या मुख्यालयातच असलेल्या मुंबई सेंट्रल आगारात प्रवाशांच्या वाढत्या गर्दीबाबत कोणतेही नियोजन केल्याचे दिसत नाही. प्रवाशांची गर्दी वाढत असल्याने आगार प्रशासनाकडून आरक्षण खिडक्यांची संख्या वाढवणे अपेक्षित होते; मात्र एकच खिडकी सुरू असल्याने प्रवाशांच्या रांगा लागल्या आहेत. शिवाय महिला, ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र खिडकी नसल्याने त्यांना तिकिटासाठी तासन् तास रांगेत



उभे राहावे लागत आहे. कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने आम्ही आगाऊ आरक्षणाला प्राधान्य देतो; मात्र एकच तिकीट खिडकी सुरू असल्याने दीड तास रांगेत उभे राहावे लागले. एसटी प्रशासनाने तिकीट खिडक्यांची संख्या वाढवण्याची गरज आहे.

# मुंबईत दोन मशिदींवर गुन्हा दाखल

**मुंबई-** मुंबईतील वांद्रे आणि सांताक्रूझ भागातील दोन मशिदींनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यानंतर पोलिसांनी दोन्ही मशिदींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गेल्या काही दिवसांपासून



राज्यात मशिदींवरील भोंग्यांवरून मोठ्या प्रमाणात राजकारण तापलेले असताना ही कारवाई करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत कोणी स्पीकर वाजवत असेल तर, त्याने ठरवून दिलेल्या डेसिबलच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र मुंबईतील दोन मशिदींनी त्याचे पालन केले नाही. त्यामुळे पोलिसांनी वांद्रे येथील नूरानी मशीद आणि सांताक्रूझ येथील कब्रस्तान मशिदीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गुरुवारी सकाळी वांद्रे येथील नुरानी मशिदीमध्ये लाऊडस्पीकरवर नमाज अजान करण्यात आली. सकाळी ६ च्या आधी लाऊडस्पीकर न वापरण्याबाबत पोलिसांनी एक दिवस अगोदर सूचना देऊनही मशिदीत सकाळच्या अजानसाठी लाऊडस्पीकर वापरण्यात आले. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांचा भंग केल्याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी भादंवि कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलिसांच्या कलम ३७ (१), (३), १३५ नुसार तक्रार दाखल केली आहे. कायदा आणि ध्वनी बंदी नियमांचे कलम ३३ (R) (३) अंतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २००५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी गोंगाट करणाऱ्या उपकरणांवर बंदी घातली होती. या आदेशानुसार लाऊडस्पीकर वाजवण्यापासून ते मोठ्या आवाजात संगीत, फटाके फोडण्यापासून हॉर्न वाजवण्यापर्यंत बंदी घालण्यात आली आहे. या कलमाने आदेशात रात्रीच्या वेळी ध्वनिप्रदूषण करणाऱ्या कोणत्याही उपकरणांचा वापर करण्यास मनाई केली आहे.

# मर्जीतील कंत्राटदारासाठी मुंबईतील नामफलकावर १५० कोटींचा चुराडा होणार?

**मुंबई-** मुंबईतील रस्त्यावर वाहतुकीच्या सुविधेअंतर्गत दिशा नामफलकाची निविदा देताना ठराविक कंत्राटदाराला झुकते माप देण्याचा आरोप होत आहे. या कंत्राटामुळे मुंबई महापालिकेचा १५० कोटी रूपयांचा चुराडा होईल. तर पालिकेने वॉर्ड स्तरावर हे काम केल्यास यामधून पालिकेचा निम्मा खर्च वाचू शकतो असेही सांगण्यात येत आहे. मुंबई महापालिकेच्या नामफलकाच्या कंत्राटासाठी ठराविक कंत्राटदाराला लाभदायक होईल अशा पद्धतीने निविदा प्रक्रिया होत असल्याचे पत्रही माहितीचे अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहित निविदा रद्द करण्याची मागणी गलगली यांनी केली आहे.

मुंबईतील पूर्व, पश्चिम आणि शहर विभागात महानगरपालिकेच्या रस्त्यावर वाहतुक सुविधा अंतर्गत दिशा नामफलकाचे १५० कोटींची निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यामुळे निश्चित करण्यात आलेल्या



अटी व शर्ती विशिष्ट कंत्राटदार असलेले आरपीएस इन्फ्रास्ट्रक्चर आणि स्पेको इन्फ्रास्ट्रक्चर यांस लाभदायक होईलस असेही गलगली यांचे म्हणणे आहे. अशा पद्धतीने कंत्राट दिल्याने कोणतीही स्पर्धा होणार नसून यात पालिकेचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि पालिका आयुक्तांना पत्र पाठविले आहे. त्यासोबतच पैसे वाचवण्याचा उपायही मुंबई महापालिकेला सुचवला आहे.

मुंबई महापालिकेने नामफलकाची निविदा देण्याचे काम वॉर्ड स्तरावर केल्यास पालिकेचे ७५ कोटी वाचतील, असा अनिल गलगली यांचा दावा आहे. अनिल गलगली यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, महानगरपालिका आयुक्त याच्या निदर्शनास आणले की काही विशिष्ट कंत्राटदारांना लाभ दिला जात आहे. यामुळे कंत्राटदारांची मक्तेदारी निर्माण होईल आणि पात्र बोलीदारांच्या संख्येत कपात होईल. संबंधित महापालिका अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यात झालेले संगनमत तोडण्यासाठी स्पर्धा होणे आवश्यक असून टर्नओव्हर बाबत अटी व शर्तीत बदल करण्याची आवश्यकता आहे.

# शेतकरी बांधवांना बियाणे व खते कमी पडू देणार नाही

## रासायनिक खते व बियाणे बाबत गैरप्रकार आढळल्यास कडक कारवाई केली जाईल-पालकमंत्री दादाजी भुसे

पालघर : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांना आवश्यकतेनुसार खते व बियाणे पुरविण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बियाणे व खते कमी पडणार नाही याची काळजी घेतली जाणार भेसळयुक्त खते, बनावट बियाणे विक्री करून शेतकरी बांधवाची कोण फसवणूक करत असेल अशा गैरप्रकाराबाबत कडक कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत असे कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले खरीप हंगाम आढावा बैठक व पत्रकार परिषद जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती त्या वेळी पालकमंत्री दादाजी भुसे बोलत होते यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा वैदेही वाढण, सर्वश्री आमदार श्रीनिवास वनगा, सुनील भुसारा राजेश पाटील जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सलीमठ तसेच जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व पत्रकार उपस्थित होते प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये जिल्हयातील एकूण 24964 शेतकऱ्यांनी 12655.44 हेक्टर क्षेत्रासाठी सहभाग नोंदविला असून 208 शेतकऱ्यांना 23.91 लाख रुपयांचे विमा अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा झाले आहे. • हवामानावर आधारीत फळपिक विमा योजन चिकू, आंबा, काजू व केळी 283 शेतकऱ्यांनी 190.05




हेक्टर क्षेत्रासाठी सहभाग नोंदविला असून 283 शेतकऱ्यांना रक्कम 56.11 लाख रुपयांचे विमा अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा झाले असल्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले हवामानावर आधारीत फळपिक विमा योजना- आंबा, काजू व केळी योजनेमध्ये जिल्हयातील एकूण 2884 शेतकऱ्यांनी 1507.71 हेक्टर क्षेत्रासाठी सहभाग नोंदविला आहे. गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना 2021-22 मध्ये 34 अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर केले असून 6 प्रस्ताव मंजूर झाले म.गां.रा.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत फळबाग लागवड सन 2021-22 मध्ये पालघर जिल्हयात 2700 हेक्टरचे उद्दीष्ट देण्यात आले होते. पैकी जिल्हयात 2201.48 हेक्टर क्षेत्रावर फळझाडांची लागवड करण्यात आली असल्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले महाडीबीटी पोर्टल वर 10780 अर्ज प्राप्त निवड झालेले लाभार्थी 3480 लाभ दिलेले 590 अनुदान वितरण . 339.51 लाख रुपये आत्मा योजने अंतर्गत कृषि प्रदर्शन, प्रात्यक्षिके, शेतकरी अभ्यासदौरे, शेतकरी प्रशिक्षण, शेतीशाळा, शेतकरी मित्र, शेतकरी किसान गोष्टी इत्यादी घटकांकरीता सन २०२१-२२ मध्ये . ९९.७० लाख रुपये अनुदान खर्च करण्यात आले आहे.सन २०२२-२३ मध्ये ५०० हेक्टर क्षेत्रावर नाविन्यपुर्ण बाब काळा भात पिक प्रात्यक्षिके आयोजित करणे प्रस्तावित आहे. (सन २०२१-२२ मध्ये २०० हेक्टर वर राबविण्यात आले.) सन २०२२-२३ मध्ये १००० मत्स्यबीज बोटुकलीचा डब्यांचा पुरवठा करणे प्रस्तावित आहे. (सन २०२१-२२ मध्ये ८९१ शेततळयात मत्स्यबीज बोटुकली पुरवठा.) • पालघर जिल्ह्यात खरीप हंगामात काळा भात लागवड, भाजीपाला लागवड, भुईमुग लागवड, नागली लागवड, मोगरा लागवड काळा तीळ, वरई लागवड, मत्स्यशेती संगोपन, मिरची लागवड, हरभरा लागवड, कलिंगड लागवड, भेंडी लागवड याप्रमाणे एकुण ५३ शेतीशाळा राबविण्यात आल्या आहेत. सन २०२२-२३ मध्ये पालघर जिल्ह्यात एकूण ९२ शेतीशाळा राबविणे प्रस्तावित आहे.

पृष्ठ १ वरुन

## ट्रक व टॅम्पो चोरी करणा-या आरोपींना

ठेवलेला असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेला होता. सदरील गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाच्या घटनास्थळास भेट देवून गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या व तांत्रीक मदतीच्या आधारे आरोपी १) ओमप्रकाश राममनी यादव, रा. जि. प्रयागराज, राज्य-उत्तरप्रदेश, २) बिल्ली ऊर्फ चंद्रकांत रामचंद्र शेनोरे, रा. सिन्नर, जि. नाशिक यांना वर नमुद गुन्हयांत अटक करुन त्यांचेकडून चोरीस गेलेला ट्रक व टेम्पो असा एकुण-९,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ व श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, तसेच पोहवा/नामदेव ढोणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## रेल्वे वर जबरी दरोडा टाकणारा सराईत

असल्याचे प्राथमीक तपासात निष्पन्न झाले. नमुद आरोपीचे शोध कार्य सुरू केले परंतु आरोपी हा सराईत असल्याने तो पोलीसांचे हालचालीवर लक्ष ठेवुन होता व तो सातत्याने त्याचे लोकेशन बदलत होता. त्यामुळे तो पोलीसांचे हाती लागत नव्हता.

दिनांक ०१.०५.२०२२ रोंजी सपोनि / गंभीरराव यांना गुप्तबातमीदाराकडुन आरोपीचा सुगावा लागला आरोपी वसाहत सोडुन बाहेरगावी जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली त्यावरून स्थागुशा व रेल्वे पोलीस ठाणे औरंगाबाद यांचे संयुक्त तपास पथक तयार करण्यात आले .नमुद पथकाने वाळुज गायराण वस्तीकडील रोडलगत सापळा रचला. तपास पथक झाडे झुडपांचा आडोसा घेउन आरोपीची वाट पाहत होते त्याचवेळी नमुद आरोपी वाळुज गायराण वसाहतीकडे मोटार सायकल वर जाताना दिसुन आला व तो शिवानंद ठकसेन काळे हाच असल्याची खात्री करण्यात आली व तपास पथकाने त्यास लागलीच पकडुन ताब्यात घेतले. आरोपीस विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हयातील चोरी गेलेल्या सोन्याची चैन ही वरखेड ता नेवासा जि अहमदगर येथे विकी केल्याचे सांगीतले. आरोपीचा सांगण्यावरून नमुद ठिकाणावर जावुन चोरीची गेलेली सोन्याची चेन हस्तगत करण्यात आली आहे. नमुद आरोपीविरूध्द विविध पोलीस ठाण्यात खुन,जबरी चोरी,दरोडा तसेच अवैध अग्णीशस्त्रे बाळगणे असे गुन्हे दाखल असुन काही गुन्हयामध्ये तो फरार आहे .नमुद आरोपीच्या अटकेमुळे मोठया प्रमाणावर चोरीचे / जबरी चोरीचे/दरोडयाचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे .

सदरची धाडसी कार्यवाही ही मा.मोक्षदा पाटील पोलीस अधिक्षक लोहमार्ग औरंगाबाद व मनोज पगारे उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री सुरेश भाले, सपोनि श्री प्रशांत गंभीरराव,सफौ / श्री.शकर राठोड,पोना/ प्रमोद जाधव,पोना/प्रशांत मंडळकर,पोशि/सुरज गभणे सर्व नेम रथागुशा लोहमार्ग औरंगाबाद तसेच रेल्वे पो.स्टे.औरंगाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री साहेबराव कांबळे,सपोनि श्री अमोल देशमुख,पोह / राहुल गायकवाड,मपोह / सोनाली मुंढे यांनी केली आहे. लोहमार्ग पोलीस तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी केलेल्या या उल्लेखनीय व धाडसी कार्यवाही करीता मा.मोक्षदा पाटील पोलीस अधिक्षक लोहमार्ग औरंगाबाद यांनी तपास पथकास १०,०००/-रु. रोख बक्षीस घोषीत केले आहे.

## मंदिराच्या पुजाऱ्याच्या हत्येचा उलगडा

पोलिसांनी कसून तपास केल्यानंतर परिस्थितीजन्य पुराव्यांवरुन मृत मारोती पुंड यांचा मुलगा गणेश मारोती पुंड याला ताब्यात घेऊन तपास केला. पोलिसांनी कसून चौकशी केली असता गणेश पुंडने हत्येची कबुली दिली.

...म्हणून मुलाने वडिलांची हत्या केली!

मारोती पुंड हा आपल्या मुलाला चांगली वागणूक देत नव्हता. कायम त्याला घालून पाडून बोलत असे. त्यामुळे दोघा बाप-लेकात सतत वाद होत होते. हा राग मनात धरुन मुलगा गणेश पुंडने पित्याचा खून केला. पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे. वाशिम ग्रामीण पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. या हत्येमध्ये आणखी काही आरोपी आहेत का किंवा घटनेचे दुसरं कारण काय असू शकतं याचा तपास पोलीस करत आहेत.

12 ते 15 वर्षांपूर्वी मंदिराची स्थापना

मारोती पुंड यांनी मागील 12 ते 15 वर्षांपूर्वी वाशिम केकतउमरा रस्त्यावर आपल्या शेतात दुर्गामातेच्या मंदिराची स्थापना केली होती. मंदिराची देखभाल आणि पूजाअर्चा मारोती करत असत.

हे मंदिर रस्त्याला लागूनच असल्यामुळे भाविकांचा मोठा ओढा या मंदिरात होता. त्यामुळे मंदिरातील दान पेटीत चांगल्या प्रकारे दान मिळत होते. यासाठी मंदिरात तीन दानपेट्या लावण्यात आल्या होत्या. मिळालेल्या दानातून अन्नदान केलं जात असे.

## बोईसरमधील कंपनीत

आस्थापनेवरून कंपनीत कामगारांचा वाद सुरू होता. हा वाद थेट न्यायालया पर्यंत पोहचला असून न्यायालयाकडून या प्रकरणात पुढील काही दिवस मुंबई लेबर युनियनच्या कामगारांना विराज कंपनी च्या आवारात जाण्यास बंदी घालण्यात आली होती. मात्र कंपनी काही कंत्राटी कामगारांना आतमध्ये घेऊन काम सुरू ठेवत असल्याची चाहूल कर्मचाऱ्यांना लागताच जवळपास तीनशे ते चारशे मुंबई लेबर युनियनच्या कामगारांनी थेट कंपनीच्या आत मध्ये शिरून राडा सुरू केला. या राड्यानंतर मदतीसाठी आलेल्या पोलिसांनाही मुंबई लेबर युनियनच्या कर्मचाऱ्यांनी दगडफेक करत मारहाण करण्यास सुरुवात केली. या मारहाण आणि दगडफेकीत तब्बल 17 पोलीस कर्मचारी आणि दोन पोलीस अधिकारी जखमी झाले आहेत. जखमी पोलीस कर्मचाऱ्यांवर बोईसरमधील टिमा आणि तुंगा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून जवळपास 27 पेक्षा अधिक जणांना अटक करण्यात आली आहे. दगडफेक सुरू केल्यावर पोलिसांनी ही दुसऱ्या बाजूने लाठीचार्ज सुरू केला या लाठीचार्जमध्ये अनेक कामगारही जखमी झाले आहेत. बोईसर तारापूर औद्योगिक वसाहतीत विराज प्रोफाइल ही सर्वात मोठी कंपनी असून या कंपनीत जवळपास आठ ते दहा हजार कामगार काम करतात. येथील कामगारांनी मुंबई लेबर युनियन स्थापनेसाठी मागील दोन महिन्यांपासून काम बंद आंदोलन केलं होतं. मात्र या युनियनला कंपनी व्यवस्थापन आणि स्थानिक लेबर युनियनच्या कामगारांचा विरोध होता त्याच वादातून हा राडा झाल्याच आता



संपादकीय...

# नियम: गरज आणि मर्यादा

माणूस सामाजिक प्राणी आहे. माणसाच्या वेगवेगळ्या निसर्गदत्त क्षमतांचा विकास समाजातच योग्य प्रकारे होऊ शकतो. समाज गुण्यागोविंदाने नांदायला हवा असेल तर, व्यक्तींच्या स्वातंत्र्यावर बंधने घालावी लागतात. कारण प्रत्येकाने स्वत:ला हवे तसे वागायचे ठरवले तर सतत संघर्षांना तोंड द्यावे लागेल. असे संघर्ष हिंसेच्या पातळीवर पोचायला वेळ लागत नाही. हिंसाचाराने भांडणे मिटत नाहीत. ती काही काळासाठी दबली जातात, पण नंतर पुन्हा तोंड वर काढतात. शिवाय जो शारीरिक दृष्टीने किंवा शस्त्रबळाने जास्त ताकदवान असेल, तोच या हिंसेच्या मार्गात यशस्वी होण्याची शक्यता कितीतरी अधिक असते. टोळीने राहणाऱ्या प्राण्यांच्या जगातही असेच घडत असते.

मनुष्य हाही प्राणीच आहे हे खरेच आहे, पण उत्क्रांतीच्या प्रक्रियेत माणसाच्या विशिष्ट क्षमतांचा विकास ज्या प्रकारे झाला, त्यामुळे प्रत्येक वेळी हिंसेचा वापर न करताही आपले संघर्ष मिटवण्याचे मार्ग त्याला सापडले. कदाचित हिंसक समाज ना व्यक्तीच्या हिताचा असतो ना समाजाच्या, हे बुद्धीच्या बळावर लक्षात आल्यानंतर, माणसांच्या टोळ्यांची वाटचाल 'समाज' होण्याच्या दिशेने झाली असावी. प्रत्येक समाजात माणसा-माणसातल्या संबंधांची काही एक रचना केलेली असते. परस्परांशी कसे वागायचे याचे नियम ठरवलेले असतात. समाज रचनेत ज्या व्यक्ती किंवा गट वरच्या स्थानावर असतात, त्यांचा प्रभाव या नियमांवर असतो. साहजिकच, त्यांना जे योग्य वाटतील, त्यांचे हितसंबंध ज्यांद्वारे जोपासले जातील असे नियम तयार होतात. हे नियम जाणीवपूर्वक बिंबवण्याचा प्रयत्न केला जातो. नियम तोडले तर शिक्षा देण्याची तरतूदही केली जाते. सुरवातीला नियम पाळल्यावर मिळणाऱ्या 'बक्षिसांचे' अमिष आणि तोडल्यावर मिळणाऱ्या शिक्षेचा धाक एवढे नियमपालनासाठी पुरेसे असतातही, पण नंतर मात्र हेच नियम का आहेत यांचे स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता निर्माण होते. कारण नियम आले म्हणजे बंधने आली आणि बंधने कुणालाच मनापासून आवडत नाहीत. लहानपणी आई-वडिलांवरील विश्वासामुळे, कधी बक्षिसांच्या आशेने तर कधी शिक्षेच्या भीतीने त्यांच्या आज्ञा पाळणारी मुले वयात येण्याच्या सुमारास पालकांनी केलेल्या नियमांबद्दल प्रश्न विचारायला सुरवात करतात. खरे तर ही जी एक प्रकारची बंडखोरी असते, ती मुलांच्या बुद्धीचा त्या काळात जो विकास होतो त्याचे लक्षण असते. अशा वेळी, सुजाण पालक आज्ञापालनाच्या मूल्याला अवास्तव महत्त्व न देता नियम करण्यामागची कारणे मुलांना समजावून सांगतात आणि बदलता काळ, बदलत्या गरजा, बदललेली मूल्ये यांचे भान ठेवून काही नियमांमधे बदलही करतात.

तसे पाहिले तर व्यक्तीच्या आचरणाचे नियमन प्रत्येक समाजात निरनिराळ्या मार्गांनी केले जात असते. परंपरा, रूढी, धर्म, कायदा हे सर्व आपापल्या पद्धतींनी व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत असतात. अनेक वेळा बहुसंख्य लोक कसा विचार करतात, कसे आचरण करतात याचा एक दृश्य-अदृश्य दबाव अनेकांवर असतो. त्यापेक्षा वेगळा विचार किंवा आचार असला तर आपण समाजापासून वेगळे पडू अशी भीती बहुतेकांना असते. या उलट काही जण ते स्वत:च्या सदसद्विवेकबुद्धिला अनुसरून वागतात असा दावा करतात. खरे तर वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा यांपैकी कुठलाच मार्ग परिपूर्ण नसतो, प्रत्येकाच्या काही अंगभूत मर्यादा असतात. त्यातली महत्त्वाची मर्यादा ही ज्या काळात, ज्या परिस्थितीत हे मार्ग आखले जातात त्यांची असते. त्याचप्रमाणे नियम करण्याचा प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष अधिकार ज्यांना असतो, त्यांचा वरचष्मा त्या प्रक्रियेवर असतो. त्यामुळे हे नियम समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे असतातच असे नाही, किंबहुना नसतातच. नियम करणाऱ्यांच्या ज्ञानाच्या, आकलनाच्या मर्यादाही नियमांवर पडतात. मुद्दा असा आहे की समाज धारणेसाठी नियम गरजेचे असतात हे खरेच, त्याचबरोबर त्या नियमांचे चिकित्सक परीक्षण, मूल्यमापन वेळोवेळी होणे हेही गरजेचे असते. ते कुठले निकष लावून करायचे हा प्रश्न महत्त्वाचा आहे. या निकषांची चर्चा तत्त्वज्ञानाच्या नीतिशास्त्र किंवा नीतिमीमांसा या शाखेत केली जाते. या शाखेची ओळख आपल्या नागरिकत्वाला अधिक सुजाण बनवेल हे निश्चित.

# हित कोणाचे?

महाराष्ट्रातील चौदा महानगरपालिका आणि पंचवीस जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर करण्याचा सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी दिलेला आदेश कोणत्या राजकीय पक्षाच्या विरुद्ध किंवा बाजूने आहे, यावरच यापुढील काही काळ चर्चा होत राहील. मागासवर्गीयांना (ओबीसी) या निवडणुकीत २७ टक्के आरक्षण मिळणार नाही आणि त्याचे खापर राज्यातील महाविकास आघाडीवर फोडता येईल, यामुळे आनंद झालेल्या विरोधी पक्षांच्या मनातही न्यायालयाने आरक्षण मान्य करावे, अशीच भावना होती. मात्र ती कायमच मूक राहिली. मध्य प्रदेशातही तेथील राज्य लोकसेवा आयोगातर्फे होणाऱ्या पदभरतीत ओबीसींना १४ टक्क्यांऐवजी २७ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाला गुरुवारी स्थगिती मिळाली आहे. आरक्षण रद्द करणे किंवा त्यामध्ये कपात करणे कोणत्याच राजकीय पक्षाला मानवणारे आणि परवडणारे नाही. एकदा दिलेले आरक्षण काढून घेणे, सर्वच राजकीय पक्षांसाठी अडचणीचे. तरीही आता निवडणुकांची घोषणा करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. उन्हाळा संपता संपता पावसाळा सुरू होईल, तो संपता संपता सणासुदीचा हंगाम सुरू होईल व त्यामुळे निवडणुकांचे नियोजन करणे शक्य होणार नाही, अशी भूमिका निवडणूक आयोगाने यापूर्वीच जाहीर केली होती. तरीही या आदेशानुसार आता येत्या दोन आठवड्यांत निवडणुकांची प्रक्रिया सुरू होईल. याचा अर्थ निवडणुका जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांत त्या होतीलच, असे नाही. त्या कदाचित आणखी काही महिन्यांनीही होतील. कदाचित या काळात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील तीन महिन्यांत समर्पित आयोगाला ओबीसी समाजाची सांख्यिकी माहिती जमा करावी लागेल. तो अहवाल सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला तरच ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण पुन्हा मिळण्याची शक्यताही निर्माण होऊ शकेल. पण ज्या एखाद्या समाजघटकाला स्थानिक स्वराज्य संस्थांत प्रतिनिधित्व मिळावे म्हणून हे सारे सुरू आहे, त्यातील सत्तेचा चेहरा आरक्षणानंतर बदलेल का, हा निराळा प्रश्न.

तो महत्त्वाचा ठरतो कारण स्थानिक स्वराज्य संस्थांची सध्याची अवस्था दयनीय या सदरात मोडणारी आहे. तरीही तेथील सत्ता काबीज करण्यासाठी राज्यातील सर्व राजकीय पक्ष कंबर कसून उभे राहतील. त्या निवडणुकांत परंपरेप्रमाणे उमेदवार निवडताना, निवडून येण्याची क्षमता हाच निकष लावला जाईल. उमेदवार किती पैसा ओतू शकतो, हे अधिक महत्त्वाचे ठरेल. या संस्थांमधील लोकप्रतिनिधींची मुदत संपण्यापूर्वीच अनेक जण गुडघ्यास बाशिंग बांधून उभे राहिले आहेत. त्यातील अनेकांनी आपापल्या प्रभागात ऐन दिवाळीत पैशांची आतषबाजीही करून दाखवली. म्हाताऱ्याकोताऱ्यांना चारधाम यात्रा घडवून आणली, तारेतारकांना आणून ऐन करोनाच्या निर्बंधकाळातही चौकाचौकांत कार्यक्रमांचा धमाका उडवून दिला आणि उमेदवारी मिळाली, तर मते मिळण्याची बेगमी केली. निवडणुका जिंकण्याने कोणाला किती आणि कसला फायदा होतो, याचे उत्तर आजतागायत मतदान करणाऱ्या कुणासही उमगलेले नाही.

मंडल आयोग १९९२ मध्ये देशात लागू झाल्यावर महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१'मध्ये दुरुस्ती करून अन्य मागासवर्गीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत २७ टक्के आरक्षण देण्याची तरतूद केली. सर्वोच्च न्यायालयाने ६ डिसेंबर २०२१ रोजी एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचे कारण दाखवून राज्यातील पाच



जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील अन्य मागासवर्गीयांचे आरक्षण रद्द ठरवले. त्याच्याविरोधात राज्य सरकारने दाखल केलेली पुनर्विचार याचिकाही न्यायालयाने २९ मे २०२१ रोजी फेटाळली. त्या वेळी ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण पुन्हा द्यायचे असल्यास तीन अटींची पूर्तता करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. यानुसार मागासवर्ग आयोगाची स्थापना, ओबीसी समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्यासाठी सांख्यिकी माहिती गोळा करणे आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडता कामा नये अशी तिहेरी चाचणी करण्यास सांगण्यात आले होते. करोनाकाळात घरोघरी जाऊन सांख्यिकी माहिती गोळा करणे शक्य नव्हते. त्यामुळे राज्य सरकारने तो तपशील केंद्र सरकारकडे मागितला, परंतु केंद्राकडून त्यास नकारघंटा वाजवण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने असा आदेश देण्यास असमर्थता दाखवली, कारण तो विषय न्यायालयासमोर नाही. 'लोकसत्ता'च्या 'मध्यममार्ग हवा' (८ डिसेंबर २०२१) या अग्रलेखात याबाबत राज्याने आपल्या अधिकारात काही निर्णय घेतलाच, तर तो सर्वोच्च न्यायालय रद्द करू शकेल अशी वर्तवलेली शंका ताज्या निकालामुळे खरी ठरली आहे.

आता दोन आठवड्यांत निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला मान्य करावे लागतील. दरम्यानच्या काळात प्रभाग रचनेचे काम सरकारने स्वत:कडे घेतले. त्यालाही आता या निकालाने रद्दबातल ठरवले आहे.

राज्यातील सगळ्याच राजकीय पक्षांना आरक्षण हवे आहे. मात्र ते मिळण्यासाठी जे करायला हवे, ते आजवर कायद्याच्या चौकटीत राहून केले गेले नाही. अशा वेळी 'आम्ही असतो तर ते नक्की केले असते', या छापाच्या वाक्यांना फारसा अर्थ उरत नाही. आरक्षण द्यायचेच नव्हते, असे म्हणत सरकारवर टीका करण्याने हा प्रश्न सुटणारा नाही, एवढी समज राज्यातील राजकीय पक्षांना असायला हवी. परंतु दुबळ्या झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपली ताकद पणाला लावून, तेथे आपले झेंडे फडकवण्याने तेथील परिस्थितीत सुतराम फरक पडणारा नाही. केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करून जाहीर केलेली 'स्मार्ट सिटी योजना' आता बासनात गुंडाळली जात आहे. या योजनेसाठी यापुढील काळात केंद्राकडून निधी मिळणार नाही, असा संदेश पोहोचवला जात आहे. राज्यातील या योजनेत सहभागी असलेल्या शहरांमध्ये कोणतीही दर्शनी सुधारणाही झालेली नाही, या वस्तुस्थितीकडे कानाडोळा करून या शहरांचे हित केवळ आपणच साधू शकू, असे सांगणाऱ्या राजकीय पक्षांना तेथील समस्यांचे पुरेसे आकलनच झालेले दिसत नाही. दिवसेंदिवस शहरांमधील जीवनमान इतके खालावत चालले आहे, की त्यामध्ये नजीकच्या काळात फार मोठी सुधारणा होण्याची शक्यता नाही. पर्यायच नाही म्हणून शहरांत राहणाऱ्या नागरिकांची जगण्याचे बळ गोळा करता करताच इतकी दमछाक होते, की त्यामुळे महानगरपालिका निवडणुकांकडे गांभीर्याने पाहण्याचे त्राणच त्यांच्या अंगी उरत नाहीत. महानगरपालिका खंक अवस्थेत आहेत, तर जिल्हा परिषदा आणि ग्रामपंचायतींची दुर्दशा झालेली. ना उत्पन्नाचे पुरेसे मार्ग, ना राज्याकडून पुरेसा निधी अशा भीषण परिस्थितीतही निवडणुकांचा धुरळा उडवण्यात सगळ्यांनाच कमालीचा रस. 'नगरसेवक' असे बिरुद मिरवताना, सेवक या शब्दाला न शोभणारे गणंग आपल्या पैशाच्या आणि जातीच्या जोरावर निवडून येतात. एकदाच निवडून येणार असल्याची दुर्दम्य खात्री असल्याने, मिळेल ते ओरपून घेणे,

# मजूर महिलेच्या बाळाचं अपहरण, अवघ्या 8 तासांत चिमुकल्याची सुखरुप सुटका; आरोपी अटकेत

पालघर बोईसर येथील अपहरणाच्या घटनेचा लोहमार्ग पोलिसांनी अवघ्या आठ तासात छडा लावला आहे. बोईसर रेल्वे स्थानकावर झोका बांधून आठ महिन्याच्या बाळाला या झोक्यात झोपी घालून महिला मजूर रेल्वे ट्रॅकवर काम करत होती. तिच्या बाळाचं अपहरण करण्यात आलं ही घटना लक्षात आली तेव्हा या मोलमजुरी करणाऱ्या महिलेच्या पायाखालची जमीनच सरकली. या महिलेने जोरात जोरात टाहो फोडला आणि याप्रकरणी लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. लोहमार्ग पोलिसांनी या बाळाचा तात्काळ शोध सुरू केला. सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तपासले गेले. सर्व रेल्वे स्थानकांना सूचना दिल्या गेल्या आणि अवघ्या आठ तासांतच आरोपींच्या मुस्क्या आवळण्यात पोलिसांना यश आलं. आरोपीला पकडून बाळाची सुखरूप सुटका केली. आपल्या कुशीत बाळ आल्यानंतर या माऊलीच्या चेहऱ्यावरचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. वर्षा कन्हैया डामोर ही रेल्वे मजूर आपल्या आठ महिन्यांच्या महिमा या मुलीला बोईसर रेल्वे स्टेशनवर झोळीत झोपून झोपवून पतीसोबत रेल्वे ट्रॅकवर काम करण्यासाठी गेली होती. या संधीचा फायदा घेत आरोपीनं या मुलीला झोळीतून उचलून तिथून पलायन केलं. वर्षा सोबत काम करणाऱ्या तिच्या सहकारी महिलेला झोळीत बाळ नसल्याचं समजल्यानंतर तिनं वर्षाकडे धाव घेतली आणि वर्षाला झोळीमध्ये बाळ नसल्याचं सांगितलं. वर्षानं हातातलं काम सोडून बाळाच्या झोळीकडे धाव घेतली तिथं आल्यानंतर तिला बाळ न दिसल्यानं ती कावरीबावरी झाली आणि जोराजोरानं टाहो फोडू लागली तातडीनं त्यांनी बोईसर लोहमार्ग पोलीस ठाणे गाठून बाळ पळवून नेल्याची तक्रार दिली. पोलिसांनीही तत्परता दाखवून अज्ञातानं बाळ पळवून नेल्याचा गुन्हा तातडीनं दाखल केला. त्यानंतर पालघर लोहमार्ग पोलीस ठाण्याचे नव्यानं रुजू झालेले पोलीस अधिकारी नरेश रणधीर यांनी तातडीनं आपली तपास चक्रं फिरवली. त्यानुसार त्यांनी अपहरणाची माहिती रेल्वे स्थानकावर हजर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांसह गृहरक्षक दलाच्या जवानांना दिली. याच वेळेस मुरबे येथून रेल्वे स्थानकाकडे कामासाठी येत असलेले गृहरक्षक दलाचे जवान योगेश तरे यांना एक जण बाळ घेऊन जात असल्याचे दिसले. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता बाळाचा फोटो काढला आणि पोलीस ठाण्यात पाठवला. त्यानंतर हा फोटो त्या बाळाच्या आईला दाखवल्यानंतर हे बाळ आपलेच असल्याचे या महिलेनं ओळखलं आणि तातडीनं पोलिसांनी जवान योगेश तरे याला संपर्क साधला. त्यानंतर अतिरिक्त पोलीस बल पाठवून आरोपीच्या मुसक्या आवळल्या. ही माहिती पालघर लोहमार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरेश रणधीर यांनी दिली.


**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
**COMPUTER DEPARTMENT**

Indira Gandhi Bhavan, ChattrapatiShivajiMaharajMarg, Bhayander (W) -401101
Tal.Dist. Thane 401101

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

MBMC/COMPUTER/ 43 /2022-23 Date: - 06/05/2022

**//Quotation Notice //**

Mira Bhaindar Municipal Corporation invites sealed Quotation for following works. The Blank form and other relevant document will be available for download on MBMC website as from dt. 09/05/2022 to dt. 18/05/2022 till 1.00 p.m. Form fee and EMD should be submitted through offline, failing which the Quotation will be disqualified.

The last date for submission of Quotation computed in all respects on dt. 18/05/2022 up to 1.00 p.m. in the above mentioned website. If possible the Quotation shall be opened in the presence of their bidders or there representative on the dt. 20/05/2022 up to 1.30 p.m. at the Computer Department of Mira Bhainder Municipal Corporation.

Hon. Commissioner of Mira Bhainder Municipal Corporation has reserve right to reject any or all offline bids, without assigning any reasons.

| Sr. No. | Name of work | Estimated Amount in Rs. | Cost of Quotation Documents (in Rs.) | Earnest Money Deposit (EMD) |
|---|---|---|---|---|
| 1) | Upgrade and Annual Maintenance of Open Land Tax Software., Domain, Hosting, Storage and Backup | Rs.6,00,000/- (+ GST) | Rs. 3,200/-+ Rs.576/- (18% GST) = Rs.3,776/- (Non Refundable) | Rs. 16,000/- (Refundable) |

Note:- Quotation Submission is offline only.

Ref No.: MBMC / PRO / 48 / 2022-23
Date : 06/05/2022

Sign/-
(R.M.Gharat)
System Manager
Mira Bhainder Municipal Corporation

# गुलिस्तानगरमध्ये दोघांवर चाकूने हल्ला; एकाचा मृत्यू



अमरावती - अमरावतीतील गुलिस्ताननगरमध्ये धक्कादायक प्रकार समोर आला आहे. माझ्या मेहूण्यासोबत वाद का घातला, याबाबत विचारणा करायला गेलेल्या दोन जावयांवर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. यात एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. रविवारी दुपारी ३ च्या ही घटना घडली ( Two Stabbed In Gulistannagar One Dead ) आहे. याप्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध भादंविचे कलम ३०२, ३०७, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. फिरोजखान अफसरखान (३५, रा. गुलिस्तानगर) असे मृताचे नाव आहे. तर, शेख शकीर शेख जाबीर व सोहेल खान (दोघेही रा. गुलिस्तानगर), असे आरोपींची नावे आहेत, नागपुरी गेट पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिरोजखानचा मेहुणा शेख जबीर शेख खलील हा त्याच्या आईला घेऊन दवाखान्यात जात असताना काही अंतरावर एक रिक्षा समोर आली. त्यामुळे शेख जबीर थांबला. त्याचवेळी आरोपी शेख शकीर शेख जाबीर व सोहेल खान हे त्याच्या मागे होते. त्यावेळी दोन्ही आरोपींनी दुचाकीसमोर काढण्याच्या कारणावरून शेख जबीरला शिवीगाळ केली. त्याच्याशी हुज्जतदेखील घातली. मात्र, वाद न घालता शेख जबीर हा तेथून आईला घेऊन दवाखान्यात गेला. काही वेळाने ही बाब शेख जबीरचा जावई फिरोजखानला समजली. आरोपी हे एकाच मोहल्ल्यातील असल्याने नेमके काय घडले याची माहिती घेण्यासाठी फिरोजखान हा साडूला घेऊन गुलिस्तानगरमध्ये पोहोचला.दरम्यान, आरोपी हे त्याच परिसरातील एका मशिदीजवळ असल्याचे त्यांना समजले. परिसरातील एका शौचालयाजवळ फिरोजखानला दोन्ही आरोपी दिसले. त्यावेळी त्यांना विचारणा केली असता, शेख शकीर हा फिरोजखान व त्याच्या साडूच्या मागे चाकू घेऊन धावला. साडूने चाकूचा वार चुकवत तेथून पळ काढला. तर फिरोजखान हा जीव वाचवत पळत असताना शेख शकीरने त्याच्यावर हल्ला केला. गंभीर जखमी स्थितीत फिरोजखान हा त्याच भागातील एका घराजवळ कोसळला. तेवढ्यात सोबत असलेला साडू तिथे पोहचला. त्याने दुचाकीवर फिरोजखानला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यानंतर रुग्णालयात फिरोजखानचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरु असल्याची माहिती नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे ठाणेदार पुंडलिक मेश्राम यांनी दिली आहे.

# एनसीबीची धडक कारवाई, हायड्रोपोनिक विड, कोकेन आणि 2 लाखांची रोकड जप्त, तिघे अटकेत

मुंबईत (Mumbai NCB) पुन्हा एनसीबीनं धाड टाकर एक ड्रग्ज रॅकेट उध्वस्त केलं आहे. मुंबईतील अंमली पदार्थ पुरवठादार आणि पेडलर्स विरुद्ध नार्कोटिक कंट्रोल ब्युरो (Narcotics Control Bureau) मुंबई सतत लढत आहे. NCB मुंबईने 06 मे आणि 07 मे रोजी दोन ऑपरेशनमध्ये मुंबईतील विविध ठिकाणी छप्पा टाकून 445 ग्रॅम हायड्रोपोनिक वीड (गांजा), अल्प प्रमाणात कोकेन आणि 2 लाख 96 हजारांची रोकड जप्त केली आहे. पहिल्या कारवाईत मिळालेल्या माहितीच्या आधारावर 225 ग्रॅम हायड्रोपोनिक वीड (गांजा) 6 मे रोजी मुंबईच्या परदेशी पोस्ट ऑफिसमध्ये जप्त करण्यात आला. हे पार्सल कॅनडातून इनबाउंड होतं. याप्रकरणाचा पुढे पाठपुरावा करताना, एनसीबी मुंबईच्या पथकानं 7 मे रोजी रात्री



उशिरा मालाड येथे रिसीव्हरच्या घरावर छापा टाकून 220 ग्रॅम हायड्रोपोनिक विडसह 2 लाख 96 हजारांची रोकड जप्त केली. एनसीबी मुंबईनं याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

त्यानंतर मिळालेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे दुसऱ्या कारवाईत एनसीबी मुंबईनं मिरा रोड पूर्व येथे अल्प प्रमाणात कोकेन जप्त केलं आणि 6 मे रोजी सदर खेप स्विकारणाऱ्याला अटक केली. घटनास्थळी चौकशीच्या आधारे एनसीबी, बंगळुरूच्या पथकानं बंगळुरू येथे रिसीव्हरसाठी सापळा रचला. या कारवाईत अल्प प्रमाणात कोकेनसह एका आफ्रिकन पुरुषाला पकडण्यात एनसीबीच्या पथकाला यश आलं आहे. ड्रग्स जीन्सच्या पँटमध्ये विणलेल्या कुरिअरमध्ये आली होती. एनसीबी मुंबईनं याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. एनसीबी मुंबईचे झोनल डायरेक्टर अमित घावटे यांच्या नेतृत्वात एनसीबीच्या पथकानं कारवाई केली होती.

# संगमनेरमध्ये शेततळ्यात बुडून बहीण- भावाचा दुर्दैवी मृत्यू



अहमदनगर : संगमनेर तालुक्यातील मोधळवाडीतील घाणेवस्ती येथे शेततळ्यात बुडून सख्या बहीण- भावाचा दुर्दैवी मृत्यू ( Brother Sister Drowned ) झाला आहे. ही घटना रविवार ८ मे रोजी सकाळी घडली आहे. या दुर्दैवी घटनेने मोधळवाडी गावात शोककळा पसरली आहे. जयश्री बबन शिंदे वय ( वर्षे २१ ) व आयुष बबन शिंदे वय ( ७ ) असे बहीण- भावाचे नाव आहे. संगमनेर तालुक्यातील पिंपळगाव देपा गावांतर्गत असलेल्या मोधळवाडीतील घाणेवस्ती येथे बबन चांगदेव शिंदे हे आपल्या कुटुंबासमवेत राहात आहे. रविवारी सकाळी मुलगी जयश्री व मुलगा आयुष हे दोघे बहीण- भाऊ धुणे धुण्यासाठी आपल्याच शेतात असलेल्या शेततळ्यावर गेले होते. आयुष हा शेततळ्यातून पाणी काढत असताना त्याच दरम्यान त्याचा पाय घसरला आणि तो शेततळ्यात पडला. त्यामुळे त्याला वाचवण्यासाठी बहीण जयश्री हिने शेततळ्यात उडी मारली. मात्र, दोघेही शेततळ्यातील पाण्यात बुडाले.गावावर शोककळा

जयश्री व आयुष हे दोघे बहीण - भाऊ शेततळ्यात बुडाल्याची माहिती समजताच आजूबाजूच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर दोघांनाही शेततळ्यातून बाहेर काढण्यात आले. पण त्या अगोदरच बहीण- भावाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी संगमनेर कुटीर रूग्णालयात नेण्यात आले आहे. तर बहीण- भावाच्या दुर्दैवी मृत्यूने पिंपळगाव देपा गावासह पठारभागावर शोककळा पसरली आहे. जयश्री व आयुष या दोघा बहीण- भावाचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ होता.

# नांदेडात डॉक्टरचा अल्पवयीन मुलीवर अत्याचार; पीडितेचा गर्भपात



नांदेड - किनवट शहरात दवाखान्यात कामाला असलेल्या अल्पवयीन मुलीवर डॉक्टरने विविध आमिष दाखवून सातत्याने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या नराधमाच्या कृत्यामुळे पीडिता गर्भवती राहिल्याने हे प्रकरण उघडकीस आले. पीडितेच्या पालकांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी नराधम डॉक्टरवर गुन्हा दाखल करुन अटक केली आहे. डॉ. विकास सुंकरवार असे या आरोपीचे नाव आहे. दवाखान्यात कर्मचारी म्हणून काम करत होती मुलगी - आपल्या दवाखान्यात कामासाठी असलेल्या एका अल्पवयीन मुलीवर डॉक्टरने सातत्याने लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी पोलिसांनी डॉक्टराला अटक केली आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट शहरात घडलेल्या या घटनेने खळबळ उडालीय. किनवट शहराच्या डॉक्टरलेन भागात डॉ. विकास सुंकरवार या डॉक्टरचा दवाखाना आहे. या दवाखान्यात एक अल्पवयीन मुलगी गेल्या अनेक दिवसांपासून कर्मचारी म्हणून काम करत होती. पोटात दुखू लागल्याने प्रकार उघडकीस - डॉ. सुंकरवार याने पीडित मुलीस वेगवेगळी आमिषे दाखवली. एवढचं नव्हे तर धमकी देत दिच्यावर सातत्याने लैंगिक अत्याचार केला. नोव्हेंबर २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत डॉक्टरने सतत लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप पीडित अल्पवयीन मुलीने केला आहे. अत्याचारामुळे अल्पवयीन पीडिता ही गर्भवती राहिली होती. पीडितेच्या पोटात काल दुखू लागल्याने तिला नातेवाईकांनी शहरातील एका नामांकित दवाखान्यात आणले. तेथील डॉक्टरांनी पीडितेची तब्येत पाहून काही चाचण्यांसाठी तिला अन्य एका दवाखान्यात पाठविले.

डॉक्टर विरुद्ध गुन्हा दाखल - पीडित मुलीचा चाचणीपूर्वीच गर्भपात झाल्याने तिला तातडीने गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. या प्रकरणी पीडित मुलीने इन कॅमेरा जबाब नोंदवला आहे. डॉ. विकास सुंकरवार यानेच आपल्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा जबाब तिने पंचासमक्ष नोंदविला आहे. पीडितेच्या जबाबावरून पोलिसांनी नराधम डॉ. विकास सुंकरवार याला तातडीने ताब्यात घेतलं. त्याच्याविरूद्ध कलम ३७६, पोक्सो ४, ६ व इतर वेगवेगळ्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे, अशी सहायक पोलीस निरीक्षक घुले यांनी दिली आहे.

# स्वत:वरच गोळीबार करण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाने शुटरला दिली होती सुपारी



ठाणे - अंबरनाथ पश्चिम भागातील एका बांधकाम व्यावसायिकाने स्वतःवरच गोळीबार करण्याची दोन शुटरला सुपारी दिल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. विशेष म्हणजे त्या बांधकाम व्यावसायिकाने शुटरलाच पिस्तुल पुरवत गोळीबार करण्यास सांगितल्याचे उघडकीस आल्याने अंबरनाथ पोलिसांनी याप्रकाणातील दोघा आरोपींना अटक केली आहे. मोहम्मद हुसेन आणि सुखविंदर सिंग असे अटक केलेल्या शुटरची नावे आहेत. तर कमरुद्दीन खान असे स्वतःवर गोळीबार करण्यासाठी सुपारी देणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाच नाव आहे.

कार्यालयाच्या खिडकीतून केला होता गोळीबार :

बांधकाम व्यावसायिक आरोपी कमरुद्दीन खान आणि नियाज सिद्दीकी यांच्यात एका जागेवरून वाद सुरु आहे. त्यातच नियाज सिद्दीकी या बांधकाम व्यावसायिकाला खोट्या गुन्ह्यात अडकविण्यासाठी आरोपी कमरुद्दीन याने स्वतःवर गोळीबाराचा प्लॅन शिजवला. त्यानुसार कमरुद्दीन खान यांच्यावर २४ एप्रिलला कॉ-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या कार्यालयात बसले असता त्यांच्यावर अज्ञात शुटरने कार्यालयाच्या खिडकीतून गोळीबार केला होता. मात्र गोळीबार करताना गोळी भितींवर झाडली होती. त्यातून पोलिसांना संशय आला होता. शिवाय गोळीबाराचा सगळा प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला होता. या प्रकरणी अंबरनाथ पोलिसांनी मोबाईल नंबरच्या लोकेशन वरून मोठ्या शिताफीने मोहम्मद हुसेन आणि सुखविंदर सिंग या दोघा शुटरला 6 मे रोजी अटक केली.

बांधकाम व्यावसायिक कमरुद्दीन खान फरार : अटक शुटरकडे पोलिसांनी अधिक चौकशी केली असता कमरुद्दीन यानेच गोळीबार करायला सांगितला होता. अशी दोन्ही शुटरने पोलिसांना कबुली दिली. या दोघा शुटरकडून गुन्ह्यात वापरलेले पिस्तुल, काही जिवंत काडतुसे आणि बाईक जप्त करण्यात आली आहे. मात्र कमरुद्दीन खान हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त जगदीश सातव यांनी दिली आहे.

# मुंबईत हत्या, मेघालयमध्ये पकडले नायजेरिन आरोपी! दोन राज्यांच्या पोलिसांची समन्वयानं कामगिरी

नालासोपाऱ्यात घडलेल्या एका हत्येच्या गुन्ह्यामध्ये परराज्यातील पोलिसांशी समन्वय साधत मुंबई पोलिसांनी आरोपींना जेरबंद केलं आहे. नालासोपाऱ्यात हत्या करुन फरार झालेल्या आरोपींना मेघालयमध्ये अटक करण्यात आलं आहे. याबाबत मेघालय पोलिसांनी ट्वीट करत माहिती दिली आहे. त्यांनी म्हटलं आहे की, मुंबईतील एका खुनाच्या गुन्ह्यासाठी काही नायजेरियन नागरिकांबद्दल मुंबई पोलिसांनी अलर्ट केलं होतं. यासाठी एक ऑपरेशन सुरू करण्यात आले आणि 6 नायजेरियन नागरिकांना लाड उमसॉ, रि-भोई




येथे पकडण्यात आले. मुंबईत गुन्हा केल्यानंतर खालील नायजेरियन नागरिकांचा डावकी इंडियामार्गे भारतातून बांगलादेशात पळून जाण्याची तयारी होती, अशी माहिती मिळाली आहे.

नालासोपाऱ्यात नायजेरियन नागरिकांकडून नायजेरियन नागरिकाची हत्यानालासोपाऱ्यात या नायजेरियन नागरिकांनी एका नायजेरियन नागरिकाची अपहरण करुन हत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. अपहरण करतानाचा cctv व्हिडीओ देखील समोर आला आहे.

नालासोपारा पूर्वेच्या प्रगतीनगर वस्तीत चार ते पाच नायजेरियन नागरिकांनी घरात घुसून एका नायजेरियन नागरिकाला मारहाण केली होती. त्यानंतर त्याचं अपहरण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. मायकल कीचेबाबा (वय 50) असं मयत नायजेरियन व्यक्तीचं नाव आहे. 3 मे रोजी आरोपींनी प्रगतीनगर इथल्या त्याच्या राहत्या घरी घुसून मारहाण केली होती. त्याला मारत मारत एका गाडीत बसवून त्याचं अपहरण करण्यात आलं. हा सर्व प्रकार रस्त्याकडेला लावलेल्या सीसीटीव्हीत कैद झाला होता. गुरुवारी मायकलचा मृतदेह नायगाव परेरानगर इथल्या एका रूमच्या टॉयलेटमध्ये पोलिसांना आढळून आला. सीसीटीव्हीत दिसत असलेल्या आरोपींनीच त्याची हत्या केली असल्याची माहिती समोर आली होती. अमली पदार्थांच्या आर्थिक व्यवहारातून ही हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. वळीव पोलिसांनी याप्रकरणी पाच ते सहा जणांविरोधात हत्येचा गुन्हा नोंद केला होता.

# 19 वर्षीय विद्यार्थिनीची हत्या करुन मृतदेह पोत्यात भरुन फेकला

मुंबई : मुंबईतील गोरेगाव पोलिसांना समुद्रकिनाऱ्यावर गोणीत भरलेल्या अवस्थेत एका १९ वर्षीय विद्यार्थिनीचा मृतदेह सापडला होता. NEET परीक्षेची तयारी करणारी 18 वर्षीय तरुणी सोनम शुक्लाच्या ( Sonam Shukla Murder Case ) हत्याकांडाचा उलगडा पोलिसांनी केला आहे. पोलिसांनी आरोपी मोहम्मद अन्सारी ( Mohammad Ansari Arrested ) नावाच्या



तरुणाला अटक केली आहे. त्याने सोनमचा गळा दाबून खून करत मृतदेह नाल्यात फेकून दिला असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

सोनम 25 एप्रिल रोजी दुपारी 4 वाजता शिकवणीला जाण्यासाठी तिच्या घरातून निघाली होती. त्यानंतर ती बेपत्ता होती. तिचा मृतदेह वर्सोवा भागात समुद्रकिनाऱ्याजवळ आढळून आला होता. ती गोरेगाव पश्चिम भागातील प्रेमनगर भागात वास्तव्यास होती. सोनम शिकवणीला जात असल्याचे सांगून घरातून बाहेर गेली. पण ती शिकवणीला गेली नाही. रात्री 9 च्या सुमारास ती एका मैत्रिणीच्या व मित्राच्या घरी गेली होती. सोनम रात्री उशिरापर्यंत घरी न आल्याने वडिलांनी तिला फोन केला. त्यावेळी तिने लवकरच घरी येणार असल्याचे, सोनमने वडिलांना सांगितलं. पण रात्री 11.30 वाजले तरी सोनम घरी आली नसल्याने वडिलांनी तिला पुन्हा फोन केला पण तो बंद लागला, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, सोनम ही बेकरी मालक असलेल्या मोहम्मद अन्सारीच्या घरी गेली. त्यावेळी मोहम्मदाचे आई-वडील घरी नव्हते. सोनम आणि आरोपी अन्सारी हे दोघे रिलेशनशीपमध्ये होते. त्यांच्यात यावेळी वाद झाले. अन्सारीने सोनमला घरी बोलावून तारेच्या वायरने गळा आवळून खून केला. त्यानंतर हात पाय बांधून तिचा मृतदेह एका पोत्यात भरून मालाड पश्चिमच्या नाल्यात टाकून दिले होते. सोनम घरी न आल्याने ती बेपत्ता असल्याची तक्रार गोरेगाव पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आली होती. त्यानंतर 28 एप्रिल रोजी सोनमचा मृतदेह आढळून आला. वडिलांनी आरोपीचा उल्लेख केल्यानंतर पोलिसांनी त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपीने सोनमच्या हत्येची कबुली दिली. पोलिसांनी आरोपी अन्सारीला अटक केली असून गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

# मुंबई एनसीबीची कारवाई, तीन ड्रग्ज तस्करांना अटक

मुंबई - मुंबई नार्कोटिक कंट्रोल ब्युरोने मुंबईत दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये 445 ग्रॅम हायड्रोपोनिक अल्प प्रमाणात कोकेन आणि 2 लाख 96 हजारांची रोकड जप्त केली आहे. 06 मे आणि 07 मे रोजी या दोन कारवाया करण्यात आल्या. या कारवाईमध्ये तीन आरोपींवर एनडीपीएस कलम नुसार गुन्हा दाखल करत अटक केली आहे.

रिसीव्हरच्या घरावर छापा - पहिल्या कारवाईत मिळालेल्या माहितीच्या आधारावर 225 ग्रॅम हायड्रोपोनिक 6 मे रोजी मुंबईच्या परदेशी पोस्ट ऑफिसमध्ये जप्त करण्यात आला. हे पार्सल कॅनडातून इनबाउंड होतं. याप्रकरणाचा पुढे पाठपुरावा करताना एनसीबी मुंबईच्या पथकानं 7 मे रोजी रात्री उशिरा मालाड येथे रिसीव्हरच्या घरावर छापा टाकून 220 ग्रॅम हायड्रोपोनिक सह 2 लाख 96 हजारांची रोकड जप्त केली. एनसीबी मुंबईनं याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.जीन्सच्या पँटमध्ये ड्रग्स - मिळालेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे दुसऱ्या कारवाईत एनसीबी मुंबईनं मिरा रोड पूर्व येथे अल्प प्रमाणात कोकेन जप्त केलं आणि 6 मे रोजी सदर खेप स्विकारणाऱ्याला अटक केली. घटनास्थळी चौकशीच्या आधारे एनसीबी बंगळुरूच्या पथकानं बंगळुरू येथे रिसीव्हरसाठी सापळा रचला. या कारवाईत अल्प प्रमाणात कोकेनसह एका आफ्रिकन पुरुषाला पकडण्यात एनसीबीच्या पथकाला यश आलं आहे. ड्रग्स जीन्सच्या पँटमध्ये विणलेल्या कुरिअरमध्ये आली होती. एनसीबी मुंबईनं याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. एनसीबी मुंबईचे झोनल डायरेक्टर अमित घावटे यांच्या नेतृत्त्वात एनसीबीच्या पथकानं कारवाई केली होती.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898